# महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ
## भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ

फोन नं. :०२२ - २४०९३११०
०२२ - २४०३१४९८
फॅक्स क्र : ०२२ - २४०९३११०
www.cpfmseb.2011@gmail.com
website : www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
भविष्य निर्वाह निधी विभाग,
धारावी रोड, माटुंगा (पू) मुंबई ४०० ०१९.

**क्र.लेवि/भनिनि/कनिवेयो/ D/२३१९** **दिनांक: १८.०४.२०१८**

**परिपत्रक क्र. २१२**

**विषय:-** सेवानिवृत्ती वेतनाचे प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे आणि मार्च, २०१२ नंतरच्या महिन्याचे कर्मचारी निवृत्ती वेतन निधीची (E.P.S.) रक्कम आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, बांद्रा, मुंबई यांना अदा झाल्याची खात्री करुनच सेवानिवृत्तीचे / भ.नि.नि. अंतिम प्रदानाचे प्रस्ताव पाठवणे बाबत.

सेवानिवृत्ती वेतनाचे / भ.नि.नि. अंतिम प्रदानाचे प्रस्तावाची छाननी करत असता ब-याच वेळा असे आढळून येते की एखाद्या कर्मचा-याची एका पेक्षा अधिक महिन्याची पुरवणी पगाराची रक्कम अदा करताना जेवढया महिन्याचे वेतन अदा केले त्या प्रत्येक महिन्याची कर्मचारी निवृत्ती वेतन निधीची (E.P.S.) रक्कम भ.नि. निधी विवरणपत्रात न दाखवता एकाच महिन्याची रक्कम दाखवली जाते. त्यामुळे आयुक्त, भविष्य निर्वाह निधी, बांद्रा, मुंबई कार्यालयाकडे त्या कर्मचा-यांच्या नावे कर्मचारी निवृत्ती वेतन निधीची (E.P.S.) कमी रक्कम जमा होते.

सेवानिवृत्त कर्मचा-यांचे अर्ज कर्मचारी निवृत्ती वेतन निधीची (E.P.S.) रक्कम अदा झाल्याशिवाय क्षेत्रिय कार्यालय, आयुक्त भविष्य निर्वाह निधी बांद्रा, मुंबई येथे मंजुरीसाठी पाठविता येत नाहीत व त्यामुळे निवृत्ती वेतन मंजूर होण्यास विलंब होतो.

सदरचा विलंब टाळण्यासाठी आणि कर्मचारी / सभासदास त्वरीत सेवानिवृत्ती वेतन / भ.नि.नि. अंतिम प्रदानाची रक्कम मिळावी म्हणुन खालील काही सुधारीत मुद्दे विचारात घेवुनच सेवानिवृत्ती वेतनाचे / भ.नि.नि. अंतिम प्रदानाचे प्रस्ताव पाठवावेत.

१) सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव पाठवतांना कर्मचा-याचा एका पेक्षा अधिक महिन्याचा पुरवणी पगार काढल्यानंतर त्या प्रत्येक महिन्याच्या निवृत्ती वेतन निधीची (E.P.S.) रक्कम भ.नि. निधी विवरण पत्रकात महिनावार नमुद करावी.

२) जर एखाद्या कर्मचा-याची काही महिन्याची कर्मचारी निवृत्ती वेतन निधीची रक्कम भविष्य निर्वाह निधी आयुक्त कार्यालय बांद्रा, मुंबई यांना वर्ग झाली नसल्याचे दिसून आल्यास निवृत्त कर्मचा-याची निवृत्ती वेतन निधीची भरावयाची रक्कम पेन्शन धारकाचे नाव आणि भविष्य निर्वाह निधी क्र. इ. तपशिलाचा महिनावार तक्ता बनवुन सांघिक कार्यालयास कळवावे व सदरची रक्कम सांघिक कार्यालयाने भविष्य निर्वाह निधी आयुक्त बांद्रा, मुंबई यांचेकडे भरल्यानंतरच क्षेत्रिय कार्यालयानी सेवानिवृत्ती वेतन / भ.नि.नि. अंतिम प्रदानाचे प्रस्ताव भविष्य निर्वाह निधी कार्यालय माटुंगा मुंबई येथे पाठवावेत.

३) सेवा काळातील बिनपगारी रजेचा (EOL) तपशिल दर्शविताना कर्मचा-याची निवृत्ती वेतन निधीची रक्कम पुर्ण कपात झाली असेल (जसे रु. ४१७/-, ५४१/- व रु. १२५०/- इ.) तर त्या कर्मचा-याची त्या महिन्यात बिनपगारी रजा असली तरी ती रजेच्या तक्त्यात दर्शविण्यात येवू नये.

**१०ड (निवृत्त कर्मचा-याच्या बाबतीत)**

१) फक्त सभासद पती व पत्नी या दोघांचेच संयुक्त ३ फोटो पाठवावेत (याव्यतिरिक्त पती / पत्नीचेआणि २५ वर्षाखालील अपत्याचे कोणाचेही संयुक्त किंवा स्वतंत्र फोटो पाठवण्याची आवश्यकता नाही.)

२) फक्त सभासद पती आणि पत्नीचेच संयुक्त बँक खाते पुस्तिकेच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत प्रस्तावासोबत पाठवावी. २५ वर्षाखालील अपत्यांचे बँक खाते उघडून बँक खाते पुस्तिकेच्या पहिल्या पानाच्या छायांकित प्रती पाठवण्याची आवश्यकता नाही.

३) सभासदाने पती व पत्नीचे आधारकार्ड, वयाचे दाखले आणि सेवापुस्तिकेच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत प्रस्तावासोबत जोडावी. २५ वर्षाखालील अपत्यांचा फक्त जन्मतारखेचाच पुरावा सादर करावा.

४) २५ वर्षावरील कोणत्याही अपत्याचे नाव प्रस्तावात नमुद करु नये व प्रस्तावासोबत त्यांचे आधारकार्ड, जन्मदाखले, बँक खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाच्या छायांकित प्रती इ. पाठवू नयेत.

५) सभासदाचे जे नाव बरोबर आहे तेच नाव संयुक्त निवेदन पत्रावर, बँक खाते पुस्तकावर, निवृत्तीवेतन प्रस्ताव, आधारकार्ड इ. कागदपत्रावर एकसारखे आहे याची खात्री करुनच प्रस्ताव भ.नि.नि. माटुंगा, मुंबई येथे पाठवावेत.

६) जे सभासद मार्च २०१२ किंवा त्याअगोदर निवृत्त झालेले आहेत अशा कर्मचा-यांचे मार्च २०१२ पुर्वीचे फक्त १२ महिन्याचेच वेतनाचा आणि बिनपगारी रजेचा तपशिला द्यावा आणि जे सभासद मार्च २०१२ नंतर निवृत्त झालेले आहेत त्यांचे सेवा निवृत्तीपुर्व ६० महिन्याचा तपशिल द्यावा.

७) कर्मचा-याच्या पत्नीचे माहेरचे नाव असे होते आणि लग्नानंतर सासरचे नाव असे झाले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती वेगवेगळया नसून एकच आहेत अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) प्रस्तावासोबत सादर करण्याची आवश्यकता नाही.

**१०ड (मृत कर्मचा-याच्या बाबतीत)**

१) जर एखाद्या कर्मचा-यास २ हयात पत्नी असतील तर पहिल्या पत्नीचेच नाव प्रस्तावात लिहावे व विवाह नोंदणी दाखला आणि वयाचा दाखला प्रस्तावासोबत जोडावा. पुर्नविवाह केला असेल तर पहिल्या पहिल्या पत्नीची घटस्फोटाची प्रत व दुस-या पत्नीचा विवाह नोंदणी दाखला जोडावा.

२) कर्मचा-याच्या पत्नीचे माहेरचे नाव असे होते आणि लग्नानंतर सासरचे नाव असे झाले आहे. दोन्ही नावाच्या व्यक्ती वेगवेगळया नसून एकच आहेत अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र (Affidavit) प्रस्तावासोबत सादर करण्याची आवश्यकता नाही.

३) मृत कर्मचा-यांच्या वारसांनी पती / पत्नी आणि २५ वर्षाखालील प्रत्येक अपत्यांचे स्वतंत्र फोटो असावेत. संयुक्त फोटो पाठवु नयेत तसेच एकाच बँकेच्या शाखेत स्वतंत्र बँक खाते उघडलेल्या खाते पुस्तकाच्या छायांकित प्रती सादर कराव्यात. प्रस्तावामध्ये बँकेचा संपुर्ण तपशिल, बँकेचे नाव, शाखा, गावाचे नाव, तालुका, जिल्हा पिन कोड नं. द्यावा.

४) सभासद पती / पत्नी व २५ वर्षाखालील मुलांचे सहयांचे नमुने असलेले फॉर्म प्रत्येकाचे स्वतंत्र असावेत.

५) सभासदाच्या मृत्यू दाखल्याची मुळ प्रत आणि जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला व २५ वर्षाखालील प्रत्येक वारसाचा जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायांकित प्रत वयाचा पुरावा म्हणुन प्रस्तावासोबत सादर कराव्यात.

६) क.नि.वे. योजना १९९५ चा फॉर्म एफ - २ सादर करताना विहीत नमुन्यात सर्व वारसांची नावे व जन्मतारखा नमुद करुन सदर फॉर्म कार्यालयीन साक्षांकनासहीत सादर करावा व या संदर्भात सदर कर्मचारी / सभासदाकडून कायदेशीर वारस प्रमाणपत्र (Legal heir certificate) घेण्याची आवश्यकता नाही.

७) मयत कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन प्रस्ताव व ई.डिएल.आय. (कर्मचारी अनुबध्द ठेव विमा योजना १९७६) प्रस्ताव नामनिर्देशन प्रतीसह एकाच वेळी पाठविण्यात यावेत. दोन्ही प्रस्ताव स्वतंत्रपणे पाठविण्यात येवू नयेत. मा.सं. विभागाने याबाबत कर्मचा-याच्या वारसास अवगत करुन त्यांना दोन्ही प्रस्ताव एकाच वेळी सादर करण्याविषयी लेखी कळवावे.

हे परिपत्रक सर्व कंपन्यांच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

राजपूरकर

सचिव
म.रा.वि.मंडळ, भ.नि.नि. विश्वस्त मंडळ,
धारावी रोड, माटुंगा, मुंबई-१९.

प्रत:- प्रेषण यादीप्रमाणे:-
महानिर्मिती/महापारेषण/महावितरण